# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : १०४/२०२२/अहमदनगर**

१ श्री. राजाराम उर्फ राजेंद्र शंकर घनवट, : तक्रारदार
मु.पो.वाडेगव्हाण,
ता.पारनेर, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट राज्य विद्युत वितरण कंपनी पारनेर,
उपविभाग, चेडे बिल्डींग स्टेट बँकेमागे, पारनेर,
ता.पारनेर, जि.अहमदनगर

**तक्रार सुनावणी दिनांक – ०४/०८/२०२२**

तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०४/०८/२०२२ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ८७६/२०२०/अहमदनगर वरील निर्णय दिनांक १७/१२/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.पारनेर उपविभाग, श्री.प्रशांत भानुदास आडभाई यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १५/०४/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य पुरवावी. त्यापेक्षा अधिकची माहिती हवी असल्यास योग्य ते शुल्क आकारुन पुरवावी व त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा."

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १५/०४/२०१९ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार माहिती अवलोकनास उपलब्ध करुन न देता २७ पृष्ठांची चुकीची माहिती पुरविली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांनी आयोगास दिनांक १३/०४/२०२२ रोजी पाठविलेल्या अहवालात असे नमूद केले आहे की, आयोगाचे दिनांक १७/१२/२०२१ रोजीचे आदेश दिनांक ०२/०२/२०२१ रोजी प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने दिनांक १६/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे.

सुनावणीच्या वेळी म्हणणे मांडण्याची संधी दिली असता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, आयोगाचे दिनांक १७/१२/२०२१ रोजीचे आदेश दिनांक ०२/०२/२०२१ रोजी प्राप्त झाले होते. तथापि, माझा अपघात झाल्याने मी दिनांक ०९/०१/२०२२ ते दिनांक १८/०२/२०२२ या कालावधीत वैद्यकीय रजेवर असल्याने माझ्या रजेकाळात श्री.निलेश रोहनकर यांनी तक्रारदार यांना दिनांक १६/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे.

तसेच तक्रारदार यांनी सुनावणीदरम्यान आयोगास असे स्पष्ट केले की, आयोगाने दिनांक १७/१२/२०२१ च्या आदेशान्वये माहिती अवलोकनास उपलब्ध करुन देऊन आवश्यक माहिती पुरविण्याबाबतचे निर्देश दिले असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२ या कालावधीतील माहिती दिली आहे. मी माहिती अर्जान्वये माहे जुन २०१४ ते एप्रिल २०१९ या कालावधीतील माहिती मागितलेली असताना सदर माहिती दिलेली नाही. उपरोक्त प्रमाणे दिलेली माहिती ही चुकीची आहे.

उपरोक्त सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक ८७६/२०२०/अहमदनगर वरील दिनांक १७/१२/२०२१ रोजीच्या पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना अवलोकनाची संधी न देता अपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) आयोगाचे द्वितीय अपील आदेश प्राप्त झाले तेव्हा कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.पारनेर उपविभाग यांनी आयोगाकडील द्वितीय अपील क्रमांक ८७६/२०२०/अहमदनगर वरील निर्णय दिनांक १७/१२/२०२१ रोजीच्या पारीत आदेशास अनुसरुन अवलोकनाची संधी न देता अपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

२)	वरील निर्देशासह प्रस्तुत तक्रार क्रमांक १०४/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री.निलेश रोहनकर (द्वितीय अपील आदेश प्राप्त झाला त्यावेळी कार्यरत जन माहिती अधिकारी) उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., पारनेर उपविभाग, चेडे बिल्डिंग स्टेट बँकेमागे पारनेर, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

---

क्र.रामाआ-नाशिक/तक्रार क्र.१०४/२०२२/अहमदनगर/ओ- २०४८ दिनांक- १८/१०/२०२२